१७८
८.

## MAHARASHTRA ACT No. VII OF 1991.

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1990.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १९ फेब्रुवारी १९९१ रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. VII OF 1991.

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971 WITH TETROSPECTIVE EFFECT.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २२ जानेवारी १९९१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकेचाळीसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (१९७१ चा महा. ४७.)

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अधिनियम, १९९० असे म्हणावे. (संक्षिप्त नाव व प्रारंभ.)

(२) तो दिनांक ३० जून १९९० रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १ मधील पोट-कलम (४) मध्ये "१९९०" या आकड्याऐवजी "१९९३" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महा. ४७.

व्यावृत्ती. ३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, तिने १ जुलै १९९० रोजी प्रारंभ होणाऱ्या आणि शासकीय राजपत्रात, हा अधिनियम प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही कृतीमुळे, अशी कृती किंवा अकृती ही या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध नसेल तर, कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्धीस पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमाद्वारे, दिनांक ३० जून १९९० नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत त्या दिनांकापासून दिनांक ३० जून १९९३ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढविल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झाला असल्याचे मानण्यात येणार नाही व या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आणि वाढविण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अमलात असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.